Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March-23

(CCCXCVIII) 398

## Research Methodology in Languages & Social Sciences




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Pawar B. T.
Principal
Late Dr. S. S. College
Kalamnuri, Dist.- Hingoli

**Editor**
Kendre D. B.
Dept. of Hindi,
Late Dr. S. S. College
Kalamnuri, Dist. - Hingoli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 23 | सामाजिक संशोधनात प्रश्नावलीची उपयुक्तता प्रा.डॉ. हुरगूळे एन. आर. | 86 |
| 24 | संशोधनात माहिती संकलनाच्या पध्दती आणि प्रश्नावली : एक अभ्यास प्रा.माणिक भिकाजीराव डोखळे | 90 |
| 25 | संशोधनातील तथ्य संकलन पद्धती. संतोष दत्तराम जाधव | 96 |
| 26 | सामाजिक संशोधनातील मुलाखत सुची चे गुण - दोष डॉ. रेखा बालाजीराव पाटील | 102 |
| 27 | इतिहास लेखनामध्ये ॲनल्स परंपरेचे योगदान डॉ. विजयकुमार प्रल्हादराव भांजे | 105 |
| 28 | सामग्री विश्लेषण आणि लेखन प्रा. राखी रामकृष्ण इंगळे | 108 |
| 29 | प्रश्नावली चे प्रकार प्रा. डॉ. रमेश वि. मोरे | 112 |
| 30 | संशोधन कार्यात नमुना निवड आणि त्याचे फायदे प्रा. डॉ. डी. एस.केंद्रे | 115 |
| 31 | संशोधनातील नमुना निवडीची तंत्रे डॉ. गणपत रामसिंग पवार | 119 |
| 32 | उस्मानाबाद जिल्हयातील साक्षरता : एक भौगोलिक अभ्यास प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 123 |
| 33 | काव्य समीक्षा आणि संशोधनाच्या दिशा : विशेष संदर्भ "मनमौन" कवितासंग्रह डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 128 |
| 34 | सामाजिकशास्त्रामधील संशोधनाची आवश्यकता एक चिंतन डॉ. आकाश शेषराव नांगर | 135 |
| 35 | सामाजिक संशोधनातील नीतीमूल्य विचार डॉ. शंकर लेखणे | 140 |




Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308 March , 2023

# सामाजिक संशोधनातील नीतीमूल्य विचार

डॉ. शंकर लेखणे
लोकप्रशासन विभाग प्रमुख, श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालय, शंकरनगर

प्रस्तावना:

सामाजिक संशोधन हे समाजाशी निगडित असते. समाज हीच सामाजिक शास्त्रांची प्रयोगशाळा असते. व्यक्ती व समाज यांचे जीवन व जीवन विषयक अन्य पैलूंचे तर्कशुद्ध व सैद्धांतिक पद्धतीने अध्ययन करून सामाजिक विकास व लोककल्याण साधण्याचा प्रयत्न सामाजिक संशोधनातून होत असतो. समाजातील रूढी, परंपरा, भाषा, आर्थिक व राजकीय परिस्थिती यासारख्या अनेक विषयांशी निगडित समस्यांचाही अभ्यास सामाजिक संशोधनातून होत असतो.'सामाजिक विज्ञान पद्धती मानव व मानवाच्या सामाजिक व्यवहाराशी संबंधित नियमांचे अन्वेषण करते, तसेच जुन्या नियमांचे पुनर्परीक्षण करते, येथे मानवाला अध्ययनाचे केंद्र मानले जाते. यातील अध्ययन समाजाचे असल्यामुळे त्यातील परिपूर्णता ही प्राकृतिक विज्ञानाच्या तुलनेत कमी असते. यात विषयवस्तूच्या मापनाची संधी कमी असते.'(संशोधनप्रणाली, पृष्ठ-२०) मॉरीस आर. कोहेन यांनी म्हटल्याप्रमाणे,'समूह जीवनातील मानवी जीवन व्यवहारांचे विश्लेषण सामाजिक शास्त्रात केले जाते.'(सामाजिकसंशोधनपद्धतीपृष्ठ-9) सामाजिक संशोधनातून समाजातील समस्यांचे समाधानही शोधले जात असते. 'सामाजिक संशोधनामुळे सामाजिक शास्त्राची प्रगती होते व वेगवेगळ्या सैद्धांतिक संकल्पनाचा विकास होत असतो. त्यामुळे संशोधक हा संशोधनामध्ये वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारणारा असावा. सामाजिक संशोधनामध्ये वस्तुनिष्ठता अत्यंत महत्त्वाची आहे. भौतिक शास्त्रातील संशोधनांमध्ये वस्तुनिष्ठतेचा प्रश्न निर्माण होत नाही कारण तेथे व्यक्ती निष्ठेला वाव नसतो. परंतु सामाजिक संशोधनांमध्ये व्यक्तीनिष्ठता असू शकते. व्यक्तीनिष्ठतेमुळे सामाजिक संशोधनाचे निष्कर्ष प्रेरित होऊ शकतात.'(संशोधनपद्धती,पृष्ठ-2.30) म्हणून सामाजिक संशोधनामध्ये संशोधकाची नैतिक भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कोणत्याही बाह्य प्रभावाला बळी न पडता आपल्या संशोधनातील निष्कर्ष जसे आहेत तसेच मांडले पाहिजेत. अशावेळी सामाजिक संशोधनातील नीतीमूल्यांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

**संशोधनलेखातीलसंज्ञावसंकल्पनाचे स्पष्टीकरण:-**

**सामाजिकसंशोधन, नीतिमूल्ये,नैतिकता**

(१) स्लेसिंजर स्टीव्हेंसन यांच्या मते,"संशोधन प्रक्रियेचे तीन पैलू असून त्यामध्ये सामान्य करणाच्या हेतूने संकल्पना, प्रारूप यांचा उपयोग वर्तमान ज्ञानाची कक्षा वाढविणे, त्यात सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे आणि प्रमाणित ज्ञानाचा सिद्धांत निर्मितीसाठीच व्यवहारासाठी उपयोग करणे होय."(संशोधनपध्दतीपृष्ठ-१)

(२) पी. व्ही.यंग यांच्या मते,"समाज जीवनाबाबतची नवी तत्त्वे शोधण्यासाठी किंवा जुनी तथ्ये तपासण्यासाठी त्यातील क्रम संबंध व कार्यकारण भाव आणि त्या आधारे सिद्धांत शोधण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे सामाजिक संशोधन होय."(संशोधनपध्दतीपृष्ठ-२)

(३) नीतिमूल्ये-नैतिकता—

नीती हा शब्द सामाजिक संदर्भामध्ये वापरला जातो. दुसऱ्याशी चांगली बोलणे, चांगले संबंध ठेवणे, कोणतीही गोष्ट सदसदविवेकाच्या आधारावर करणे, प्रत्येक कार्य सत्य व प्रामाणिकपणे करणे, कोणाशीही निपक्षपातीपणे वागणे हा अर्थ 'नीती' या शब्दात अंतर्भूत आहे.'नैतिकता' हे नीतीचे विशेषण आहे.(नैतिकमूल्य शिक्षण)



Scanned with CamScanner

संशोधन लेखाचाउद्देश:

प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश सामाजिक संशोधनांमध्ये नीतीमूल्यांच्याविचाराचे महत्त्व जाणून घेण्याचा आहे. त्याचबरोबर संशोधकाने संशोधन कार्य करताना कोणत्या नीतिविषयक बाबींचावगुणांचा अवलंब केला पाहिजे हे जाणून घेणे आहे.

तथ्य संकलन:

प्रस्तुत संशोधन लेखासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. सामाजिक संशोधन या विषयावरील संदर्भ ग्रंथांचा तसेच इंटरनेटवरील साहित्याचा संदर्भम्हणूनअवलंब करण्यात आला आहे.

आशय विश्लेषण:

भौतिक शास्त्रातील संशोधन व सामाजिक शास्त्रातील संशोधन यामध्ये फरक असलेला आपणास दिसून येतो. 'भौतिक शास्त्रातील संशोधन करताना संशोधक संशोधनाच्या नैतिक परिणामांचा विचार करीत नाही तो नवीन शोध लावतो, त्या शोधाचा वापर कोणत्या कामासाठी करायचा ते राज्यकर्ते ठरवितात. संशोधनामुळे काही शोध असे लागतात की ते मानवाला घातक ठरतात. शास्त्रज्ञ असे म्हणू शकत नाहीत की मानवतेला घातक असे संशोधन मी करणार नाही. शास्त्रज्ञांनी अशी भूमिका घ्यावी हे खरे असले तरी ते शक्य नसते. अण्वस्त्रांचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञाला हिरोशिमा नागासाकी वर अणुबॉम्ब टाकल्याने प्रचंड मनुष्यहानी झाली त्यावेळी काय वाटले असेल? ज्या वैमानिकाने अणुबॉम्ब टाकले त्याला नंतर फार वाईट वाटले. शास्त्रज्ञांना मूल्यविवेक करण्याचे स्वातंत्र्य नसते.' (पायाभूत अभ्यासक्रम, पृष्ठ-९७) त्यामुळे अशा संशोधनाचा चांगल्या कार्यासाठी तसेच विघातक कार्यासाठी ही उपयोग होत असतो. सामाजिक संशोधन करताना मात्र संशोधक आपले संशोधन करत असताना नितीमूल्यांचा विचार करू शकतो. आपले संशोधन समाज उपयोगी असावे असा मूल्य विचार करू शकतो. आपले संशोधन तर्कशुद्ध व सत्याचे योग्य अन्वेषण करणारे असावे यासाठी संशोधक पूर्वग्रहमुक्त असावा लागतो. सामाजिक संशोधनामध्ये संशोधक जर पूर्वग्रह दूषित असेल, प्रचलित विचार, परंपरा यांच्या प्रभावाखाली असेल तर त्याच्या संशोधनातून निघणारे निष्कर्ष हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असत नाहीत, त्यामुळे संशोधन करत असताना संशोधक हा वस्तुनिष्ठ, प्रामाणिक व तर्कशुद्ध पद्धतीने विचार मांडणारा असावा लागतो. प्रोफेसर जेम्स ड्रॉवर यांनी म्हटल्या प्रमाणे 'पूर्वग्रह ही एक अशी मनोवृत्ती आहे की जी भावनात्मक रंगांमध्ये रंगली जाते. आणि जी कोणतीही विशिष्ट क्रिया, वस्तू, व्यक्ती व सिद्धांतांच्या विरोधी किंवा बाजूने असते.'(संशोधनपद्धती, पृष्ठ-२.३४)

संशोधक हा निरपेक्ष व वस्तुनिष्ठ असणे फार गरजेचे असते. 'संशोधकाची स्वतःची जीवन निष्ठा आणि नैतिक मूल्यांवरील निष्ठा ही संशोधनकार्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरते. कारण संशोधनातून प्राप्त होणारे निष्कर्ष सत्यनिष्ठेने अभ्यासका समोर मांडत असताना प्रचलित सामाजिक व्यवस्थेचे दडपण येण्याची देखील शक्यता असते. सॉक्रिटीसाच्या बाबतीतही असेच झालेले दिसून येते, सॉक्रिटिसांना विषाचा प्याला दिला गेला त्यांनी ते विष हसतहसत घेतले. परंतु संशोधनात मांडलेले निष्कर्ष बदलण्यास नकार दिला. संशोधकाच्या ठिकाणी असलेली ही नीती मूल्यांची प्रेरणाच म्हणावी लागेल. या नीती मूल्यांच्या ऐवजी जर संशोधकाने व्यक्तीनिष्ठा किंवा राजनिष्ठा महत्त्वाची मानली तर संशोधन वस्तुनिष्ठ होऊ शकत नाही. या आशियाचा विचार डॉ. गंगाधर कायंदे पाटील यांनी मांडलेले दिसून येतात.'(संशोधनपध्दती, पृष्ठ-२.३३)

संशोधन करत असताना संशोधकास अनेक नैतिक बाबीही विचारात घ्याव्या लागतात त्या म्हणजे, बौद्धिक संपदेचा आदर माहिती व संमती नियमांचे पालन करणे, गोपनीय बाबींची गोपनीयता राखणे, त्याचबरोबर विद्यापीठाने संशोधकास ज्या मार्गदर्शक सूचना केलेले आहेत त्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे या बाबी देखील यात येतात. सामान्यपणे संशोधकानी ज्या नितीमूल्यांचा अंगीकार करावा असा विचार सांगितला जातो. ती नितीमूल्ये म्हणजे



Scanned with CamScanner

'प्रामाणिकता, निष्पक्षता, नेतृत्व, सचोटी, करुणा, आदर, जबाबदारी, निष्ठा, कायद्याचे पालन, पारदर्शकता'( www.ethics.com) सामाजिक संशोधनाची मौलीकता वाढावी यासाठी हे संशोधन समाजाच्या उपयोगाचे व गरजाभिमुख असावे असे म्हटले जाते. त्यामुळे संशोधकाने अत्यंत अभ्यासपूर्वक चिकित्सा करून वस्तुनिष्ठ असे निष्कर्ष काढावेत. यासाठी संशोधकांमध्ये निश्चितच काही गुणांची व नीती मूल्यांची आवश्यकता असते. यासंदर्भातप्रा. मायकेल फास्टर यांनी संशोधकांमध्ये कोणते गुण असावेत या संदर्भात विचार मांडताना Re-searcher या इंग्रजी शब्दातील मुळाक्षरांच्या आधारावर विस्तार करून पुढील गुण सांगितले आहेत.

R-Rational - विवेकी, तर्कशुद्ध

E-Efficient / Effective - परिणामकारक

S-Subjectfuland objectful - विषयनिष्ठवउद्दीष्टपूर्ण

E- Etiquette - शिष्टाचार

A-Appreciation, Activemind, Awareness- स्वीकारार्ह

R-Responding- प्रतिसाद

C-Creativity- नवनिर्मिती

H-Honesty- प्रामाणिकता

E- Economy- आर्थिकमितव्ययता

R-Rectification-चुकांचीदुरुस्तीकरणारा (संशोधनपध्दती, पृष्ठ-३.१)

अमेरिकन सोशियोलॉजिकल असोसिएशनच्या कोड ऑफ एथिक्सने सामाजिक संशोधकांसाठी पुढील तत्वे व नैतिक आदर्श सांगितली आहेत. ती म्हणजे, व्यावसायिक क्षमता राखणे, सचोटी, Embroidery आणि वैज्ञानिक जबाबदारी, समाजातील अधिकारी व लोकांचे हीत, अधिकार व प्रतिष्ठांचा आदर करणे व सामाजिक जबाबदारी.(mr.eferrit.com)

**सारांश व निष्कर्ष:**

सामाजिक संशोधनकरत असताना संशोधकास नितीमूल्यांचे व नैतिकतेच्या विचाराचे अधिष्ठान असले पाहिजे. त्याच बरोबर संशोधनामध्ये सचोटी, प्रामाणिकपणा, पारदर्शकता, निःपक्षपातीपणा, तर्कशुद्धता, उपयुक्तता यासारख्या मूल्यांचा विचार केलेला असावा. संशोधन प्रक्रियेसाठी विद्यापीठांनी जी आचारसंहिता व मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत त्यांचा संशोधकाने तंतोतंत अवलंब व पालन करावे. संशोधन हे सामाजिक समस्यांची सोडवणूक करणारे व समाजाच्या गरजायांचा विचार करून करण्यात यावे. सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये नीतिमूल्यांचा विचार अत्यंत मौलिक स्वरूपाचा व महत्त्वाचा असलेला दिसून येतो.

**संदर्भ:**

(१) डॉ. गुरुनाथ नाडगोंडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९९

(२) डॉ. गंगाधर कायंदे पाटील, संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक-१३, तृतीय आवृत्ती २००६

(३) नीलम देवेंद्रधुरी, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८

(४) डॉ. विजय एल. जरारे, संशोधन प्रणाली, अदवैत प्रकाशन, अकोला, २००४

(५) डॉ. ना. य. डोळे, पायाभूत अभ्यासक्रम, विद्याबुक पब्लिशर्स, औरंगाबाद,१९९९

(६) किरण नागतोडे, नैतिक मूल्य शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६

(७) www.ethics.com

(८) mr.eferrit.com



Scanned with CamScanner